# महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा)

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

महसुल आयुक्त कार्यालयासमोर
आय.एस.पी.रोड,नाशिकरोड,
नाशिक-४२२ १०१ (महाराष्ट्र)
फोन: (०२५३) २४६२५१२
Email- senrtc@gmail.com

जा.क्र.मित्रा/भांडार/ ४९९ /२०२३ दिनांक :- १२/०५/२०२३

## दरपत्रक सुचना सन २०२३-२४

प्रति,

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**विषय** : प्रती प्रत दर तत्वावर झेरॉक्स मशिन सेवा सन २०२३-२४ साठी दरपत्रके मागविणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), नाशिकरोड, नाशिक या कार्यालयात खालील तपशिलाप्रमाणे प्रती प्रत दर तत्वावर झेरॉक्स मशिन सेवा पुरवविण्यासाठी तत्सम क्षेत्रातील इच्छुक सेवा पुरवठादारांकडून एक वर्षाच्या कालावधीकरिता कराराबध्द करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रती प्रत |
|---|---|---|
| १ | २५ PPM Xerox Machine<br>(Scanning, Network Printing, Photo Coping,<br>Automatic Document Feeder, Duplex Print / Xerox) | |

**अटी व शर्ती :-**

१) दरपत्रक सादर करतांना, दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.
   अ) मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
   ब) पॅनकार्डची प्रत
   क) जीएसटी प्रमाणपत्र

२) सेवा पुरवठादारास आधुनिक व सुस्थितीतील किमान १ वर्षापेक्षा जास्त वापर न झालेले झेरॉक्स मशिन उपलब्ध करुन द्यावे लागेल.

३) A-४, Legal व A-३ साईज प्रतीसाठी वेगवेगळे दर मान्य केले जाणार नाहीत.

४) एजन्सीच्या लेटरहेडवर शिक्का व सहीनिशी दर सादर करावेत. दर नमुद करतांना **सर्व करांसहित (जीएसटी सह), सर्व समावेशक** दर नमुद करावे.

५) झेरॉक्स मशिनच्या देखभाल दुरुस्ती, आवश्यक सुट्या भागांची व आवश्यकतेनुसार नवीन टोनर टाकण्याची जबाबदारी मशिन सेवा पुरवठादाराची राहील. त्यासाठी कार्यालयाकडून कुठल्याही प्रकारचे अतिरिक्त आकार, शुल्क, सर्व्हीस चार्जेस इत्यादी अदा केला जाणार नाही.

६) पुरविण्यात आलेले झेरॉक्स मशिन सुस्थितीत ठेऊन विना व्यत्यय सेवा देण्याची जबाबदारी पुरवठादाराची असेल. झेरॉक्स मशिन नादुरुस्त झाल्यास सेवा पुरवठादाराकडून विहीत मुदतीत दोष निवारण करुन झेरॉक्स मशिन सेवा बहाल न झाल्यास आवश्यक कार्यालयीन झेरॉक्स काम बाजारातून करुन घ्यावे लागल्यास, त्यासाठी झालेला खर्च सेवा पुरवठादाराच्या देय असलेल्या मासिक देयकातून वसूल करण्यात येईल.

७) स्विकृत मशिन सेवा पुरवठादारास रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर एक वर्षाच्या कालावधीकरिता करारनामा करुन द्यावा लागेल.

८) पुरविण्यात आलेल्या झेरॉक्स मशिन सेवेचे मासिक देयक, पुढील महिन्याच्या प्रथम सप्ताहात सादर करावयाचे असून, सदर देयकाची पडताळणी करुन, प्रचलित नियमानुसार शासकीय वजाती केल्यानंतर सदर देयक धनादेश / आरटीजीएसद्वारे अदा करण्यात येईल.

९) दरपत्रकात नमूद केलेल्या दराप्रमाणेच रक्कम अदा केली जाईल, त्या व्यतिरिक्त कुठलीही अतिरिक्त रक्कम देय ठरणार नाही.

१०) कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

इच्छुक पुरवठादारांनी आपले कमीतकमी व स्पर्धात्मक दर नमूद केलेले दरपत्रक, **झेरॉक्स मशिन सेवा पुरविणेसाठी दरपत्रक** असे नमूद केलेल्या बंद लखोट्यात, संचालक (प्रशासन), महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), महसुल आयुक्त कार्यालयासमोर, आय.एस.पी.रोड, नाशिकरोड ४२२१०१, दुरध्वनी क्र.०२५३-२४६२५१२ या पत्त्यावर दि.२२/०५/२०२३ रोजी १२.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशाप्रकारे पाठवावे. विहीत दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी म्हणजेच दि.२२/०५/२०२३ रोजी १४.०० वाजता उपस्थित अभिकरणांच्या समोर उघडण्यात येतील.

**(श्रीमती एम.एस.बॅनर्जी)**
**संचालक (प्रशासन)**
मित्रा, नाशिक

**प्रत :** सुचना फलक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मित्रा), नाशिक.